# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १८/०५/२०२४ (शनिवार) सकाळ**


---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक १७/०५/२०२४ रोजीचे पहाटे दरम्यान पो. स्टे. मौदा हद्दीत स्टाफसह अवैध गोवंश वाहतूकीस आळा घालणेकरिता पेट्रोलिंग करीत असताना भंडारा ते नागपूर NH-53 रोडवर बोलेरो पिकअपने अवैधरित्या निर्दयतेने गोवंश जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्याने मौजा गुमथळा येथे NH 53 वरील पुलाचे समोर नाकाबंदी सुरू केली, नाकाबंदी दरम्यान एक बोलेरो पिकअप येतांना दिसली त्या वाहनावर संशय आल्याने त्यास टॉर्च च्या सहाय्याने ईशारा देऊन थांबविण्यास सांगितले. पोलिसांना पाहून वाहन चालकाने वाहण काही अंतरावर थांबवून चालक शेतशिवारातून अंधाराचा फायदा घेऊन पळून गेला. सदर वाहनाचा क्लीनरला पकडण्यात यश मिळाले. सदर वाहनाची पाहणी केली असता बोलेरो पिकअप क्र. MH-36/AA-3241 मध्ये १२ गोवंशिय जनावरे अत्यंत निर्दयतेने कोंबून, आखूड दोरखंडाने बांधुन व जनावरांची चारापाण्याची कोणतीही व्यवस्था न करता कत्तली करिता घेऊन जातांना मिळून आले.

क्लीनरला त्याचे नाव विचारले असता त्याने आपले नाव विवेक संतोष निर्वाण राहणार लाखनि जि. भंडारा तसेच पळून गेलेल्या ड्रायव्हरचे नाव प्रतीक गभने राहणार लाखणी जि. भंडारा असे सांगीतले.

बोलेरो पिकअप वाहक यास ताब्यात घेऊन त्यांचे ताब्यातून १२ गोवंशिय जनावरे (११ जिवंत १ मृत) प्रत्येकी १०,०००/– प्रमाणे १,१०,०००/– रू व बोलेरो पिकअप किंमती ६,००,०००/–रू. व एक MI कंपनीचा मोबाइल किंमती १००००/– रू. असा एकूण ७,२०,०००/– रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सदर बोलेरो पिकअप मधील गोवंशिय जनावरांना योग्य व्यवस्थापनार्थ ज्ञान फाउंडेशन गोरक्षण केंद्र भंडारा येथे दाखल करून आरोपीतां विरुद्ध कलम ११(१) (d) (f) (e) प्रा. छळ प्रति. अधि. १९६०, सहकलम ५ अ (१), ९ महा. प्रा. सं. सुधारित अधि. २०१५ सहकलम ४२९, २७९ भादवी सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पो. अधिकारी कामठी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार पो.नि. सतीशसिंह राजपूत, पो.उपनी महेश बोथले, पो. हवा. संदीप कडु, पो. हवा. गणेश मुदमाळी, पो. हवा. रुपेश महादुले, पो.ना. दिपक दरोडे, पो.अं. अतिश गाढवे यांनी केलेली आहे.




## रेती घाटातील रेती टि.पी. पेक्षा जास्त प्रमाणात रेती भरून तसेच रेती घाटाच्या माध्यमातून संघटीत गुन्हेगारी, अवैधरित्या व्यवसाय करणारे घाट मालक व मॅनेजर यांना अटक

यातील आरोपीतांनी संगणमत करून, रेती डेपो येथुन रेती अवैधरित्या चोरटया रितीने, टि.पी. पेक्षा जास्त प्रमाणात वाहतुक करतांना मिळुन आल्याने, पो.स्टे. सावनेर येथे अप क्र. ४८२/२०२४ कलम ३७९, १०९ भा.दं.वि. सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये गुन्हा दाखल करून तपासात घेतला.

सदर गुन्हयाचे तपासामध्ये **(१) धर्मराज हुसेन रंगारी वय ४१ वर्ष, व्यवसाय ट्रक चालक, रा. रामडोंगरी, खापा ता. सावनेर जि. नागपूर (२) प्रज्वल योगेश गोखे, वय २० वर्षे, व्यवसाय ट्रक मालक, रा. गडेवालपुरा, खापा ता. सावनेर जि. नागपुर** यांना दिनांक ०९/०५/२०२४ चे २१.३२ वा. अटक करून त्यांचे कडुन तपासादरम्यान १) टाटा हायवा ट्रक क्र. MH-40/AK-8585 किंमती १०,००,०००/—रू. २) ट्रक मध्ये टिपीपेक्षा अतिरिक्त भरून असलेली रेती १.८० ब्रास किंमती १०,८००/— रू. ३) ट्रकचालक धर्मराज रंगारी याचेकडील ॲंड्राईड रेडमी कंपनीचा मोबाईल किंमती ४०००/—रू ४) ट्रकमालक प्रज्वल गोखे याचेकडील अँड्राईड विवो कंपनीचा मोबाईल किंमती ३०००/—रू. असा एकूण १०,१७,८००/— रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच तपासादरम्यान रेती डेपो क्र. ४, खापा (अ)३०१, येथील मॅनेजर **(१) दिपक उर्फ अमितकुमार केदारनाथ यादव, वय ४१ वर्षे, व्यवसाय रेती डेपो मॅनेजर, रा. प्रभाग क्र. ४, खामगाव ता. खामगाव जि. बुलढाणा (ह.मु) बाजार चौक, खापा ता. सावनेर जि. नागपूर (२) सचिन जुगलकिशोर शर्मा वय ४५ वर्षे, व्यवसाय रेती डेपो मॅनेजर, रा. वार्ड क्र. ८ आठवडी बाजार खामगाव ता. खामगाव जि. बुलढाणा (ह.मु) बाजार चौक, खापा ता. सावनेर** यांना अटक करून तपासादरम्यान त्याचे कडुन १) ओप्पो कंपणीचा काळया रंगाचा मोबाईल किंमती ४०००/— रू २) रेती भरण्यासाठी किरायाने घेतलेली जेसीबी क्र. MH-40/P-3285 किं. १२,००,०००/— रू ३) आरोपी क्र. २ कडून विवो कंपणीचा काळया रंगाचा मोबाईल किं ३०००/—रू व रेती डेपो क्र. ०४, खापा (अ)३०१, **डेपो मालक पुरूषोत्तम उर्फ पराग दिपक गुप्ता वय ३० वर्षे, व्यवसाय — ट्रान्सपोर्ट रा. शारदानगर, राजापेठ ता. जि. अमरावती** याला अटक करून त्याचे कडुन १) ॲपल आयफोन १३ प्रो मॅक्स कंपनीचा काळया निळया रंगाचा अंड्राईड मोबाईल किं. २०,०००/— रू. असा एकुण २२,४५,१००/— रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. श्री. अनिल म्हस्के सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे सावनेर ठाणेदार पोलीस निरीक्षक रविन्द्र मानकर यांचे नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल गेडाम, पोलीस हवालदार माणिक शेरे, पोलीस अंमलदार नितेश परखड, निसार शेख पो.स्टे. सावनेर यांनी तपास केलेला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर